# 1. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे - स्थापना व कार्ये

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे ची स्थापना महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (अ) अन्वये २३ मार्च १९८४ रोजी झाली. २०१३-२०१४ या वर्षामध्ये कृषी पणन मंडळाने ३० वे वर्ष पूर्ण केले आहे. कृषी पणन मंडळाचा ३० वर्षाचा कालावधी हा विविध क्षेत्रात यश संपादित करुन देणारा तसेच राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सूसुत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरला आहे. अहवाल वर्षात कृषी पणन मंडळाने कृषी पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प राबविणे, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतक-यांच्या संस्थांच्या विकासासाठी नियोजनबध्द प्रयत्न केले आहेत. राज्यात कृषि मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करुन ही केंद्रे सक्षमरित्या चालविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याचप्रमाणे महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मध्ये बदल करणे आणि बाजार समित्यांसाठी मॉडेल ॲक्ट मधील तरतूदी लागू करणेसाठी पण प्रयत्न केले आहेत.

## उद्दीष्ट्ये व प्रमुख कार्यक्रम :

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३९ (ज) अन्वये कृषि पणन मंडळाची उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहे:

१. बाजार व बाजारक्षेत्रांच्या विकासासाठी बाजार समित्यांनी हाती घेतलेले कार्यक्रम राबवुन अशा बाजार समित्यांच्या कामामध्ये समन्वय राखणे,

२. कृषि उत्पन्न बाजारांच्या विकासासाठी राज्यस्तरीय नियोजनाचे काम हाती घेणे.

३. कृषि उत्पन्न पणन विकास निधीची व्यवस्था ठेवणे व त्याचे प्रशासन करणे.

४.बाजार समित्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बाजार समित्यांना सरसकटपणे सल्ला देणे किंवा एखाद्या विशिष्ट बाजार समितीला सल्ला देणे.

५. बाजार समितीने हाती घेतलेल्या बांधकाम कार्यक्रमासंबंधातील आराखडे व अंदाज तयार करण्याच्या तिच्या कामावर पर्यवेक्षण करणे आणि त्याबाबत तिला मार्गदर्शन करणे.

६. कृषि उत्पन्नाच्या पणनशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबत प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करणे.

७. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी मंडळ निश्चित करील अशा अटींवर व शर्तीवर बाजार समित्यांना अर्थसहाय्य किंवा कर्ज देणे.

८. कृषि विषयक पणनच्या संबंधातील विषयांबाबत चर्चासत्रे, कार्यसत्रे व प्रदर्शने आयोजित करणे किंवा त्यांची व्यवस्था ठेवणे.

९. कृषि उत्पन्नाच्या पणन संबंधात सर्वसाधारण हिताच्या असतील अशा इतर गोष्टी करणे.

१०.या अधिनियमान्वये त्याच्याकडे विशेषरीत्या सोपविण्यात आले असेल असे इतर कोणतेही कार्य पार पाडणे.

११. राज्य शासन त्यांच्याकडे सोपवील अशी तत्सम स्वरुपाची इतर कार्ये पार पाडणे.

## अंमलबजावणीतील प्रमुख कार्यक्रम :

१. विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार व्यवस्था विकसीत करणेकरिता नव -नवीन सुधारणाबाबत सल्ला देणे व त्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे.

२. शासनाच्या रोजगार हमी जवाहर/रोजगार इ. योजनांच्या माध्यमातून बाजार संकूल विकसनासाठी प्रकल्प तयार करुन देणे व विविध बँकांमार्फत बाजार समित्यांना वित्त पुरवठ्यासाठी मदत /मार्गदर्शन करणे.

३. फळे भाजीपाला आणि फुले यांचे आयुष्य वाढविण्यासाठी सहकारी संस्थांना प्रशितीकरण करणे Valule addition Centre, शितगृहांची उभारणी करण्यासाठी तंत्रज्ञान उपलब्धतेबरोबरच उभारणीस मार्गदर्शन करणे.

४. विविध फळे, फुले आणि भाजीपाल्याची रोपे/बियाणे/कंद यांची आयात करणे.

५. शेतकऱ्यांसाठी परदेश दौरे आयोजित करणे.

६. बाजार समित्यांच्या कामकाजाचे संगणकीकरण करणे, प्रोजेक्शन टिव्ही उभारणे.

७. बाजार समित्यांचे पदाधिकारी/ अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

८. राज्यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित, कृषी आधारित प्रकल्प वाढविणे तसेच त्यामध्ये उत्पादित मालाच्या विक्रीसाठी मदत व मार्गदर्शन करणे.

९. विविध प्रदर्शनात भाग घेणे तसेच प्रदर्शनांचे आयोजन करणे.

१०. शेतमाल तारण योजना राबविणेसाठी बाजार समित्यांना सवलतीच्या दराने कर्ज देणे.

११. शेतमाल निर्यातवृध्दी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाचे नमुने परदेशात पाठविणे, निर्याती बाबतची माहिती शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांना देणे व त्यांच्या मालाची निर्यात करुन देणे.

१२. प्रकल्प अहवाल तयार करणे.

१३. तळेगांव ताभाडे येथील शेतीवर आधुनिक शेतीचे प्रयोग राबविणे.

१४. व्ही. एच. टी प्रकल्पातील सोई सुविधांचा व्यावसायिक उपयोग शेतकरी, निर्यातदार यांना करुन देणे.

१५. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा तसेच अनुदान मिळवून देण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन करणे.

१६. बाजार समित्यांना राज्यातील तसेच परराज्यातील अभ्यास दौऱ्यांसाठी मार्गदर्शन करणे.

१७. "कृषि पणन मित्र" **मासिकाचे प्रकाशन आणि वितरण करणे.**

१८. एन.डि.डि.बी. बेंगलोर येथे उभारीत असलेल्या 'टर्मिनल मार्केटच्या' धर्तीवर मुंबईजवळ टर्मिनल मार्केट उभारणे.

१९. 'उत्पादक ते ग्राहक' योजना वेगवेगळ्या शहरांमध्ये राबविणेकरिता संस्थांना प्रोत्साहीत करणे.

२०. प्रसिध्दी माध्यमांशी योग्य समन्वय ठेवून कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांना प्रसिध्दी देवून त्यांची माहिती बाजार समिती, शेतकरी, शेतकऱ्यांच्या संस्था यांच्यापर्यंत पोहोचवून त्याचे फायदे शेतकऱ्यांना करुन देणे.

२१. राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेअंतर्गत माती परिक्षण, शेतकरी प्रशिक्षण तसेच सुगी पश्चात तंत्रज्ञाना संबंधात विविध चाचण्या घेणे.

२२. कृषि पणन मंडळातील अधिकाऱ्यांची /कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टिने त्यांना प्रशिक्षित करणे.

२३. कृषि निर्यात क्षेत्र अंतर्गत निर्यात सुविधा केंद्रांची उभारणी करणे.

२४. हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटर मध्ये पूर्ण क्षमतेने प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच नव नविन पिकांबाबत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

२५. उत्पादक ते ग्राहक कृषि माल विक्री योजना कार्यान्वीत करुन तिचा प्रचार आणि प्रसार करणे.

२६. कृषि पणनाशी संबंधीत विषयावर माहिती पुस्तिका तयार करणे.

२७. राज्यातील बाजार समित्यांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

२८. राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत कृषि विपणनाच्या सुविधा निर्माण करणे.

२९. नक्षलग्रस्त भागातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये राषट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सोयी-सुविधांची उभारणी करणे.

३०. कृषि मालाचे ब्रॅण्ड विकसीत करणे.